**जि.प. कर्मचा-यांच्या मेळघाटातून इतरत्र ठिकाणी असलेली प्रतिनियुक्ती रद्द करणेबाबत....**

# जिल्हा परिषद अमरावती

क्रमांक - जिप/मुकाअ/स्विस/ 998 /16
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
दिनांक - 7 सप्टेंबर, 2016 (14)

**आदेश**

ज्याअर्थी, मेळघाटमधील जि.प. विविध संवर्गातील कर्मचा-यांच्या सेवा कार्यालयीन कामकाजासाठी मुख्यालयात किंवा इतर तालुक्याच्या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेल्या आहेत. मेळघाट क्षेत्र हे अनुसूचित क्षेत्र जाहीर केले असल्याने मेळघाटमधील कामकाज सुव्यवस्थित चालणे आवश्यक आहे. तसेच राज्यशासन आणि विभागीय पातळीवर मेळघाटातील विषयांना प्रथम प्राधान्य आहे.

असे निदर्शनास आले आहे की, मेळघाटात कार्यरत असलेल्या अनेक सवंर्गातील अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवा विविध पातळीवरील आदेशान्वये व काही प्रकरणांमध्ये विना -आदेश मेळघाटातून बाहेरील तालुक्यामध्ये अथवा जिल्हा मुख्यालयी प्रतिनियुक्तीवर घेतल्या गेल्या आहेत. यामध्ये मेळघाटातील कार्यरत अधिकारी-कर्मचा-यांच्या उपलब्धतेवर परिणाम होवून मेळघाटात शासकीय व निमशासकीय कामांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

त्याअर्थी, याआदेशाव्दारे मेळघाटमधून इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेल्या सर्व सवंर्गाच्या सेवा याआदेशाव्दारे रद्द करण्यात येत आहे. तसेच याआदेशाव्दोर असेही निर्देशित करण्यात येत आहे की, मेळघाटमधील अधिकारी - कर्मचा-यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे परवानगी शिवाय आपले मुख्यालय सोडू नये.

सदर आदेश मेळघाटक्षेत्रातील प्रामुख्यांने आदिवासी जनतेच्या सर्वसाधारण अडचणी दूर करुन त्यांना गुणवत्तापूर्ण जीवन उपलब्ध करुन देण्याच्या राज्य शासनाच्या दृष्टीकोनाच्या अनुषंगाने काढण्यात येत आहे.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रत सविनय सादर-

1. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
2. मा. जिल्हाधिकारी अमरावती, यांना दि. 7.9.2016 रोजी झालेल्या मेळघाटाविषयंक बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

**प्रतिलिपी-**

1. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती.

2. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण व विकास यंत्रणा, अमरावती.
3. सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती.
4. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व.
5. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सर्व.
6. तालुका वैदयकीय अधिकारी, सर्व.
7. उप अभियंता, बांधकाम/लघुसिंचन/ग्रामीण पाणी पुरवठा, सर्व उपविभाग. यांना कळविण्यात येते की, पूर्तता अहवाल 30 सप्टेबर पर्यत सादर करावा. तसेच आपल्या विभागातील मेळघाटात कार्यरत कोणी कर्मचारी प्रतिनियुक्तीवर मेळघाटाबाहेर नाही असे प्रमाणित करावे.
8. IT Cell, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अमरावती.
9. निवड नस्ती, स्वीय सहायक. मु.का.अ. कार्यालय.